"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अर्थस्य पुरूषो दासः।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ४६ ऑक्टोबर – डिसेंबर २०२४

BOOK PACKET
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

**दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी**

## *वार्षिक स्नेह संमेलन २०२४*

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

**: प्रमुख पाहुणे :**

**पद्मश्री उदय देशपांडे** यांचा परिचय प्रख्यात मल्लखांबपटू व प्रशिक्षक म्हणून मुखपत्रिकेच्या प्रकाशझोतध्ये एप्रिल–जून–२०२४ च्या अंकात आला आहे.

स्थळ : **प्राचार्य बी.एन्. वैद्य सभागृह,**
आय.ई.एस्. हायस्कूल, दादर (पूर्व),

**दिनांक : रविवार २४ नोव्हेंबर २०२४, सायं. ४.१५ वाजता**

**कार्यक्रम**

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत व प्रात्यक्षिके

**......मध्यंतर......**

- विवाहाची सुवर्ण जयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- एज्युकेशन सोसायटी तर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना श्रीमती सुखदा उदय देशपांडे यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मारुती वि. दळवी**
**कार्याध्यक्ष–संघ**

**देवदास अ. नाडकर्णी**
**कार्याध्यक्ष–एज्युकेशन सोसायटी**

संपादकीय

# वार्षिक स्नेह संमेलन

## प्रमुख पाहुणे पद्मश्री उदय विश्वनाथ देशपांडे

येत्या २४ नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्या एन. के. जी. एस. बी. संघ व एन. के. जी. एस. बी. इंडस्ट्रीयल अँड एज्युकेशन सोसायटीतर्फे दरवर्षी प्रमाणे वार्षिक स्नेह संमेलन करण्याचे योजिले आहे. या वर्षी ह्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून आपण पद्मश्री उदय विश्वनाथ देशपांडे यांची निवड केली आहे. पद्मश्री उदय विश्वनाथ देशपांडे हे एक प्रख्यात मल्लखांबपटू व प्रशिक्षक म्हणून ख्याती प्राप्त आहेत. स्वतः त्या खेळातील प्रावीण्य मिळवल्यावर ते प्रशिक्षणाकडे वळले. त्यांनी अनेक विजेते खेळाडू तयार केले. अनेक देशांतून विषेशतः जर्मनी, इंग्लंड, अमेरीका, मलेशीया, जापानमधून खेळाडू त्यांच्याकडे शिकायला येत. ५००० पेक्षा जास्त खेळाडूंना त्यांनी आत्तापर्यंत प्रशिक्षण दिले आहे. पुढे आंतरराज्य व राष्ट्रीय स्तरावर पण त्यांनी प्रथम क्रमांक पटकावले. त्यांना छत्रपती व दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त झाला. मल्लखांबाच्या प्रचार व प्रसारासाठी त्यांचे जगभर दौरे सुरू असतात. आत्तापर्यंत त्यांनी पन्नास पेक्षा अधिक देशांत जाऊन प्रशिक्षण दिले आहे व त्या त्या देशात संघटना उभ्या केल्या आहेत. मल्लखांबाचा प्रसार हा त्यांच्या मनाचा एकच ध्यास! विशेष म्हणजे त्यांनी महिला, दिव्यांग, आदिवासी, वयस्कर यांना देखील प्रशिक्षण दिले आहे. विश्व मल्लखांब फेडरेशनचे संचालक म्हणून जागतिक पातळीवर खेळाला नेण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे.

भारत सरकारने २६ जानेवारी २०२४ ला त्यांना 'पद्मश्री' किताब बहाल करून त्यांचा सन्मान केला आहे. त्यांच्या अथक परिश्रमाचे सार्थक झाल्याचे समाधान त्यांना नक्कीच मिळाले असेल.

त्या अनुषंगाने पद्मश्री उदय देशपांडे आपले ६ शिलेदार पॅरिसच्या ऑलीम्पीक स्पर्धेच्या रणांगणाला आपल्या देशाचा रांगडा खेळ 'मल्लखांबाची'' ओळख करून देण्यासाठी २५ जुलै रोजी पॅरिसला रवाना झाले होते.

मल्लखांब ऑलिम्पिकमध्ये नेण्याचे त्यांचे एकच स्वप्न आहे.

**त्यांना आमच्या अनेक शुभेच्छा !–**

**– प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर** – संपादक

**URGENT:** New Rules in Karnataka according to the govt all our land has to be linked to our Aadhaar card ( this work is done by the village accountant @shanbhog ) or else the govt will take over the all types of land. We got a call from the Inspector of revenue dept ( Prasad Goankar ) Tehsildar office from Karwar.





## प्रकाश झोत–१

**डॉ. विराज निनाद गंडभीर**

गेल्या वर्षीचे आपल्या वार्षिक स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ. निनाद अनंत गंडभीर यांचे सुपुत्र डॉ. विराज नि. गंडभीर यांनी ऑर्थोपेडिकमध्ये एम्.डी. केल्यानंतर लंडन येथे जाऊन एफ.आर.सी.एस. ही प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पदवी उच्च क्रमांकाने प्राप्त केली व ह्या त्यांच्या उच्च कर्तबगारीबद्दल त्यांना **GOLD MEDAL IN FRCS(ORTHO)** पुरस्कार बहाल करण्यात आला.



आपल्या ज्ञातीतील डॉ. विराज गंडभीर ह्यांनी त्यांच्या क्षेत्रात मिळवलेल्या ह्या पुरस्काराबद्दल आपल्या संघाला त्यांचा फार अभिमान वाटतो. त्यांची अशीच उन्नति त्यांच्या क्षेत्रात होत राहो हीच श्री मंगेश व श्री शांतादुर्गेचरणी विनम्र प्रार्थना. त्यांना आमच्या संघातर्फे शुभेच्छा!

## प्रकाश झोत–२

***Salute to Dr. Saloni Satish Wagh and Shivani Wagh another Saraswat in second-Generation leader pioneering change at Supriya Life Science. Both the girls of Mr. Satish Wagh are doing extremely well. Big bravo. Both daughters appeared in " Forbes India" dated 28th June 2024.***



Leading Supriya Lifescience Ltd, as a Whole-time Director, Dr. Saloni Satish Wagh combines technical expertise and innovative leadership to foster growth, promote diversity, and also manages to balance professional and personal life effectively.

***Dr. Saloni Satish Wagh,*** *Director*
***-Supriya Life Science Ltd***

***Leading the way : Shivani Wagh's Dynamic vision at Supriya Life Science Ltd.***

Embarking on a pioneering path, Director Shivani Wagh propels Supriya Lifescience Ltd. to the fore front of Pharmaceutical innovation, championing diversity, sustainability and cutting - edge solutions.



***Shivani Wagh,*** *Director*
***Supriya Life Science Ltd.***




# Mangsidesh Investment Pvt Ltd

MSIPL
We Make People Richer

**AMFI-Registered Mutual Fund Distributor**


402, Business Point, Paliram Road, Off S. V. Road, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West), Mumbai 400 058

Contact No. 022 4233 2300 to 2399, +91 91672 20380

## Invest in Your Future with Confidence

**Benefits to Invest in Mutual Fund:-**

1. Diversified portfolio to manage risk
2. Professional fund management expertise
3. Variety of asset classes (equity, debt, hybrid, index, ETFs)
4. Liquidity and flexibility
5. Potential for higher long-term returns




**Grow your wealth with our expertly managed Mutual Funds**

A little every month grows to something significant over time..

Invest Rs. 1,000/- Per month & get ..

| Investment Years | Total Investments | Growth rate 8% | Growth rate 12% | Growth Rate 15 % |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 275,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

Indian Equity market has given average 16% returns in last 33 years

Mutual Fund Investments are subject to market risk, Read offer documents carefully before Investing.

Activat
Go to Se

**('आपमतलबतेचा कळस' ह्या जुलै ते सप्टेंबर २०२४ च्या मुखपत्रिकेतील संपादकीयावर श्रीमती हेमांगी कुलकर्णी नाईक यांनी फार छान रितीने ''प्रतिक्रिया'' व्यक्त करत खालील मुद्दे अतिशय योग्य प्रकारे मांडले आहेत. ते आम्ही या अंकात प्रस्तुत करीत आहोत. वाचकांचा ''प्रतिसाद'' आम्हाला ही मुखपत्रिका आणखी रोचक करण्यास नक्कीच उपयुक्त ठरावी.)**

## कौटुंबिक शांतीबद्दल बोलू काहीः पिढ्यांचा तिढा सोडवण्यास काही मुद्देः

**** कुटुंबातील सर्वांसाठी :**

१. हिंसेचे परिणाम आणि संवाद कौटुंबिक दुर्लक्षता (neglect) किंवा शारीरिक, मानसिक, आर्थिक हिंसेचे बळी साक्षीदार (victim or witness of family violence) असणे हे काही जणांसाठी अत्यंत क्लेशकारक असते. त्याबद्दल मौन बाळगणे, दुर्लक्ष करणे ह्याचा पुढे त्रास होतो. त्या दुःखदायी अनुभवांबद्दल एकमेकांशी मनमोकळी चर्चा करणे उपयुक्त ठरते.

२. **छंद जोपासणे**ः घरातील प्रत्येकाने एक छंद जोपासला तर सर्वांना मनःशांती मिळेल असे म्हटले आहे की, आपल्या इथे ६४ प्रकारची कला कौशल्ये आहेत, ती (online offline) शिकण्यात शिकवण्यात आपले आयुष्य कमी पडेल!

३. **सामाजिक संपर्क**ः सामुदायिक (उदा. NKGSB संघ), शैक्षणिक, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील निरनिराळ्या सस्था, व्यक्ती, अध्यात्मिक ग्रुप्स ह्यात सक्रिय राहिल्याने, कुटुंबाव्यतिरिक्त इतरांशी संपर्कात राहून आपण ताजे तवाने राहतो.

४. **कामांची वाटणी आणि तंत्रज्ञानाचा वापर**ः आपल्याकडे सणवार, पाहुणे व घरातील न संपणारी कामे यासाठी जर नवनवीन यंत्राचा उपयोग केला (जसे, आपण मिक्सर वापरतो रगडा नाही), घरातील सर्वांनी हातभार लावला (मोठ्यांनी व लहान मुलांनी सुद्धा कमीपणा मानू नये), घर कामगारांना नेमले (गरजू लोकांना कामे मिळतात) तर रोजचा ताण, नाराजी कमी होईल.

५. **दृष्टिकोन आणि गरजांची समज**ः प्रत्येक पिढीने सहानुभूतीने एकमेकांचे दृष्टिकोन समजून घेतले, एकमेकांच्या सीमारेषा आणि गरजांचा आदर ठेवला तर कुटुंब सदस्य तणाव विरहित राहतील.

****सिनियर सिटिझन्ससाठी**

१. **प्रेमाने विचारपूस**ः ज्येष्ठ सदस्यांनी वेळोवेळी मुलांची आणि नातवंडाची विचारपूस करावी. घरातील छोटी मोठी कामे करावी, स्वतःची काळजी घ्यावी. भेदभाव, तक्रारी, टोमणे, राग राग करणे टाळावे. आपल्याला हवे ते शांत वेळी, शांतपणे सांगावे. घरातील सदस्य आपल्यासाठी जे करत आहेत त्यांचे कधी तरी कौतुक करावे. ह्या सर्व सकारात्मक वागणुकीमुळे इतरांचा ताण कमी होतो.

२. **आत्मपरीक्षण**ः आपण तरुणपणी आपल्या आई वडिलांशी व आपल्या मुलांशी कसे वागलो हे तपासून पाहावे, त्या वयात करिअर, कुटुंब, पुढील आयुष्याचे नियोजन असे संघर्ष आपण केले तसे आपली मुले आता करतायत. त्यांना सुद्धा आव्हाने आहेतच हे ध्यानी ठेवावे.

३. **तारतम्य ठेवणे**: 'हे घर माझे आहे. मी म्हणेन ती पूर्व दिशा' (hostility) हे एक टोक झाले. सर्व मालमत्ता आपल्या हयातीत मुलांना देऊन टाकणे; 'मी सात पिढ्यांसाठी कमावले' असे घोषित



करणे (emotional over-involvement) हे दुसरे टोक.

**त्यांच्या मुलांनी सुद्धा टोकाची भूमिका टाळावी :** 'तुम्ही काय मोठे केले? आम्हाला किती स्ट्रेस आहे!" (hostility) हे एक टोक 'आमच्या गरजांपेक्षा, तुमच्या गरजा, त्याग श्रेष्ठ आहेत व आजन्म तुमचे ऋणी राहू (emotional over-involvement) हे दुसरे टोक!

**दोन्ही टोकांचे संतुलन ठेवल्यास बरे नाही का?**

****प्रौढ मुले/नातवंडांसाठी**

१. **जबाबदारी वाटून घेणे**: वृद्ध आई वडिलांची जबाबदारी हे खरे म्हणजे त्यांच्या सर्व मुला-मुलींनी घ्यावी, जेणे करून कुणा एकावर भार येणार नाही. काळजीवाहू व्यक्ती प्रचंड तणाव, नैराश्य आणि चिंता अनुभवतात (वर्ल्ड फेडरेशन ऑफ मेंटल हेल्थ, २०१०), त्यांना स्वतःला सुद्धा आधार, मदत व self care ची गरज भासते ही जाणीव सर्वांनी ठेवावी.

२. **नवीन साधनांचा उपयोग**ः आपल्या वयस्क आई वडीलांचे/नातेवाईकांचे रोजचे जीवन सुखकर होण्यासाठी नवनवीन साधनांचा उपयोग करावा. दररोज आपला थोडा वेळ त्यांच्यासाठी अनमोल ठरतो.

**काही उदाहरणे**ः

* फोन/विडिओ कॉल वर गप्पा मारणे
* ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने त्यांचे छंद जोपासणे
* कार्यक्रमांना नेणे
* लायब्ररीतून पुस्तके, मासिके, रोजचा पेपर लावणे
* Walking, योगासने, व्हीलचेअरवरून फिरवणे किंवा तशी व्यवस्था करणे
* अधून मधून त्यांच्या आवडीचे पदार्थ करणे/मागवणे (उदा. नुसत्या आंबट, खतखते, डाळी तोय आणि फोडी इत्यादी !)
* फॅमिली व्हाट्सअॅप ग्रुपवर सोशल मीडियावर त्यांना सामील करणे किंवा त्यातील छान फोटो/माहिती देणे
* OTT/ YouTube वर त्यांच्या आवडीनुसार कन्टेन्ट दाखवणे

३. **अभिप्राय घेणे**: पेच प्रसंगी आजी-आजोबांचे अभिप्राय घेणे उपयुक्त ठरु शकते,

४. **एकत्र वेळ**ः ज्येष्ठांबरोबर (व्याधी लक्षात ठेवून सण, कौटुंबिक विधी, नाटक, सिनेमा, हॉटेल, सहलीसाठी एकत्र जाणे, ह्यामुळे सर्वांना ताजेतवाने वाटते. Memories तयार होतात.

म्हणतात नाः 'धन्य आहेत ते लोक, जे देताना लक्षात ठेवत नाहीत आणि घेताना विसरत नाहीत."Blessed are those who give without remembering and take without forgetting".

-हेमांगी कुलकर्णी नाईक, D/O सुलभा (nee सिंधू नाडकर्णी) दिनकर कुलकर्णी.
-Email: harmonynerul@gmail.com.

--(NKGSB संघ (ठाणे मंच) च्या मॅट्रिमोनिअल उपक्रमात ते दोघे सक्रिय होते)

।। शुभं भवतु ।।

# A Tribute to My Grandfather. A Selfless and Loving Legacy

Shri V.N. Nadkarani, fondly whom I call as Pappa.... My grandfather's life was a testament to the power of love, hard work, and dedication. Born into a middle-class family with nine siblings, he faced numerous challenges, but his determination to provide the best for his family never wavered.

Despite the struggles, he always put others before himself, ensuring his children and siblings received the best possible care. His selflessness and kindness inspired countless memories that I cherish deeply.

One of my fondest recollections is the way he would greet me with a warm kiss whenever we met. He would surprise me with thoughtful gifts from wherever his work took him, showing me that even distance couldn't diminish his love.

His thoughtfulness extended to everyday moments, like carefully cutting fruits for breakfast and setting the table with love. He was an exemplary husband, father, and grandfather, earning him a special place in my heart-a place reserved for someone more than a god.

His love and devotion were so strong that I couldn't bear the thought of leaving the country, fearing separation from him. Life eventually took him away from us, tragically cutting short his life in a fall, leaving me with a deep sense of loss and regret for not visiting him one last time.



**100th CENTENARY BIRTHDAY**

**Late Shri Vishwanath N. Nadkarni**

**Ex-Chairman State Bank of India**

**28-07-1924 - 03-08-2006**

**Those we love don't go away,**
**They walk beside us everyday,**
**Unseen, unheard and always near,**
**Still watching, blessing & loving us.**

**Fondly Remembered By**
**Jyoti-Deepak, Girish-Cathy,**
**Shirish-Mona**
**Grand Children, Great Grand Children**

Yet, I choose to hold on to the happy memories of his warm smile and loving embrace, preserving the image of his joyful face in my heart. My grandfather's legacy lives on through the countless lives he touched, and his selflessness, love, and devotion continue to inspire me.

He was also a dedicated and loving husband, who cared for his wife, my AAl, with unwavering patience and devotion during her terminal illness. With a heart full of love and a spirit of selflessness, he stood by her side, nurturing her through every moment of her journey. He did not spare any



effort to ensure her comfort and happiness. He was her rock, her confidant, and her soulmate. His love and dedication were a beacon of hope and strength for our entire family, and his devotion to her care was a testament to the power of true love.

He was a man of many talents and passions, enjoying fine music and art, and sharing his blessings with those in need. His commitment to health and fitness was evident in his active lifestyle and mindful eating habits. His quick wit and sense of humor, were an added charm and could light up any room, and his love for his family was unwavering. As his first granddaughter, I was blessed to experience the soft side of this remarkable man.

It was not just his accomplishments or achievements that defined him, but the love he shared, the lives he touched, and the legacy he left behind. His memory will continue to be a blessing to our family, and his love will forever be in our hearts....love you and miss you Pappa forever.

- **Kavita Chakraavorty** (Grand daughter)

## मुंबई मंच- आव्हान

समस्त ज्ञातीतील बंधु भगिनींना,

जसे तुम्हा सर्वांना ठाऊक आहे की सध्या आपला संघ मुखपत्रिकेद्वारे आपल्या विविध कार्यक्रम आणि योजनांची माहिती तुम्हाला देत असतो. ज्ञातीची वाढती व्याप्ती लक्षात घेता तसेच नवीन पिढीचा ज्ञातीतील सहभाग वाढावा यादृष्टीने डिजिटल माध्यमाचा उपयोग ही काळाची गरज आहे. म्हणूनच NKGSB मुंबई मंचने email आणि WA च्या माध्यमातून आपल्या उपक्रमांची माहिती तुम्हा सर्वांना देण्याचे योजिले आहे. ज्यामुळे जलद गतीने संवाद साधणे अतिशय सोपे होईल. तुमच्या पूर्ण सहकार्याची आणि संमतीची अपेक्षा आहे.

यासाठी कृपया खाली नमूद केलेले तपशील भरून देण्याची मुंबई मंच विनंती करत आहे.

१. तुमचा ई मेल:
२. मोबाईल नंबर:
3. What's App नंबर (जर वेगळा असल्यास)
४. तुमच्या मुलांचे संपर्क तपशील:
i. नाव व ई मेल:
ii. What's App नंबर

वरील तपशील भरून तुम्ही NKGSB संघाच्या email address वर (nkgsbs@gmail.com) मेल करू शकता अथवा वरील तपशील NKGSB संघाच्या पत्त्यावर (Attn.: Mumbai Manch) असे लिहून पोस्टाने पाठवू शकता.

आपल्यातील संवाद सुकर होण्यासाठी तुमच्या भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे.

## देशातील पाच इको फ्रेंडली रेल्वे स्थानकात 'कारवार'


**वार्ताहर । गोवन वार्ता**

**कारवार :** देशातील पाच इको फ्रेंडली रेल्वे स्थानकात कोकण रेल्वेच्या कारवार रेल्वे स्थानकाला मान मिळाला आहे. टाइम्स ट्रॅव्हलच्या अहवालानुसार, कारवार रेल्वे स्थानकाला तिसरे स्थान मिळाले.

कारवार रेल्वे स्थानक हे फक्त प्रवासासाठीची जागा नाही तर सुंदर पर्यावरण स्थळ म्हणून ओळखले जाते. मनाला भुरळ घालणारा निसर्ग, हिरवागार डोंगर आणि बोगद्यातून रेल्वे येताना जो अनुभव येतो तो इथल्या अद्भुत निसर्गाची साक्ष देतो. त्यामुळे कारवार रेल्वे स्थानकाचा देशातील पाच इको फ्रेंडली स्थानकांमध्ये समावेश करण्यात आला आहे. कर्नाटकातील कारवार, पंजाबचे चंदीगड, उत्तराखंडचे कतगोडम, पश्चिम बंगालमधील सेवोक, आसाममधील हाफलोंग या पाच रेल्वे स्थानकांचा यात समावेश आहे.

## श्रद्धांजली

### इंदिरा गोविंद वाघ यांचे निधन



कारवार : काजुवाडा, सदाशिवगड येथील रहिवासी इंदिरा गोविंद वाघ (वय ९०) यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सुना, मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. कारवारचे दै. 'तरुण भारत'चे एजंट मंगेश वाघ आणि प्रसाद वाघ यांच्या त्या मातोश्री होत. कारवारचे वेगवेगळ्या दैनिकांचे प्रमुख एजंट असलेल्या दि. गोविंद वाघ यांना त्यांच्या व्यवसायात इंदिरा यांनी उत्तम साथ दिली.



## आजचे कारवार-२

**माझा 'आजचे कारवार' ह्या शीर्षकाखाली लिहिलेला लेख मुखपत्रिकेच्या एप्रिल–जून ह्या अंकात आला होता. हा लेख जुलै–सटेंबरमध्ये यायला हवा होता. परंतु कांही अपरिहार्य कारणाने 'मी' पाठवू शकलो नाही. क्षमस्व.**

आज ६०–७० वर्षापूर्वीचे कारवार राहिलेले नाही. इथे आज सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय झालेली आहे. पूर्वी ४–५ माध्यमिक शाळा होत्या. आज ही संख्या वाढलेली आहे. हिंदू हायस्कूलमध्ये सुद्धा इंग्रजी माध्यमाचे वर्ग चालू करण्यात आले आहेत. कन्नड माध्यम वर्ग आहेत. परंतु इथे मराठी माध्यम शाळांचे संपूर्ण उच्चाटन झाले आहे. आर्टस, सायन्स व कॉमर्सची पदवीपर्यंतचे शिक्षण देणारी अनेक महाविद्यालये आहेत.

शिवाय सिव्हील, इलेक्ट्रीकल, मॅकेनिकल व अन्य विषयांची डिप्लोमापर्यंतचे शिक्षण देणारी सरकारी पॉलीटेक्नीक कॉलेज व आता पदवी शिक्षणाची इंजिनीयरींग कॉलेज एवढेच नव्हे तर मेडीकल कॉलेज सुद्धा आहे शिवाय B.Ed. व नर्सिंग शिक्षणाची महाविद्यालये आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणे इथल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी परगांवी जावे लागत नाही.

काही वर्षांपूर्वी प्रवासासाठी आलेल्या प्रवाशासाठी राहण्याची चांगली सोय नव्हती परंतु आता सर्व सोयींनी युक्त अगदी आधुनिक सुविधा असलेली अनेक हॉटेल्स अस्तित्वात आहेत. उत्कृष्ठ व स्वादिष्ट रुचकर जेवण पुरविणारी शाकाहारी व मांसाहारी तसेच चांगले व सर्वांच्या पसंतीस पडेल असे खाद्यपदार्थ पुरविणारी भरपूर हॉटेल्स असल्याने बाहेर गांवाहून आलेल्या प्रवासांची उत्तम सोय होते. थोडक्यात काय तर कारवार हे कुठच्याही क्षेत्रात आता मागे नाही.

मध्यंतरीच्या काळात कारवार व आसपास १० सिनेमा थिएटर्स होती. परंतु घरोघरी दूरदर्शनचे आगमन झाल्यामुळे आता जेमतेम एक सिनेमा थिएटर, कसेबसे तग धरून आहे. पूर्वी मराठी नाटकं अमाप व्हायची आतां अजिबात मराठी नाटक होत नाहीत इतकंच नाहीं तर मराठी सिनेमा सुद्धा इथे दाखविले जात नाहीत.

वैद्यकिय सेवेत पूर्वीपेक्षा खूप बदल जाणवतो. अनेक प्रायव्हेट हॉस्पीटल्स व दवाखाने आहेत शिवाय मेडीकल कॉलेज असल्यामुळे पूर्वीचे डिस्ट्रीक्ट सिव्हील हॉस्पीटल हे कॉलेजशी संलग्न आहे. इथे सर्व आजारी व रोग्यांना उत्तम सेवा दिली जाते. अगदीच असाध्य आजार असेल तर त्यांना गोवा, बेळगांव, हुबळी किंवा मणीपाल, मंगळूरला जाण्याचा सल्ला दिला जातो.

कारवार शहरात जाणवणारा विशेष बदल म्हणजे आपल्या समाजाची उणीव, जेमतेम ९-१० कुटंबं असावीत. ती सुद्धा प्रत्येक कुटंबात १ ते २ माणसं आपल्या समाजाच्या घरांच्या जागी आता २-३-४ मजली टोलेजंग इमारती आढळतात. गावातील रस्ते सर्व सिमेंटचे किंवा डांबरी. गांव स्वच्छ राखण्यात कारवार नगरपालिका विशेष काळजी घेते. समुद्रकिनारा अगदी स्वच्छ ठेवला जातो.

गणेशोत्सव पूर्वी नव्हते. आता अनेक भागांतून सार्वजनिक गणेशोत्सव साजरे केले जातात. आमच्या घरातील नवरात्रोत्सव त्याच थाटात किंबहुना जास्त उत्साहात साजरा केला जातो. परंतु मला वैयक्तीक एकच उणीव जाणवते ती आपल्या समाजाची!

**– शांताराम (अरुण) कुळकर्णी** : ७९७२४६८७८२

=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:


A name that spells its class !

**WINOVER**

**CATERERS**

**Marriages, Thread Ceremonies,**
**Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**

**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**

ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057**


=:=:=:=:=:=



# ‘‘पंचाहत्तरी’

आपण माणूस म्हणून जन्माला येतो. आई वडिलांच्या सांन्निध्यात लहानग्या जिवाचे मोठ्या लाडात बालक बनतो. आपले नामकरण होते. आपण बोबडे बोलू लागतो. उभे रहाण्याच्या प्रयत्नांत हळूहळू चालू लागतो व म्हणता म्हणता घरभर दुडूदुडू नाचू बागडू लागतो. मग हा मामा, ती आत्या, ते आजोबा, ती आजी म्हणत सर्व नाती समजू लागतो. सारे आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करीत असतात. अशात एकदम पहिला वाढदिवस येतो. बरेच कौतुक होते व बरेच उपहारही मिळतात. थोडे मोठे होत होत शाळेत जाऊ लागतो-लिहू वाचू लागतो-मित्र जमवू लागतो. तेव्हाचे हसणे, रडणे, रुसणे, ओरडणे, ओरड खाणे मस्तीच मस्ती असते!
मी कोण वगैरे कशाचाच पत्ता नसतो व तसा विचार करण्याची क्षमताही नसते. हे आपले घर, हे माझे बाबा, ही माझी आई, भाऊ वा बहिण बस! हेच आपले विश्व असते.

हळूहळू जगातल्या, आसपासच्या गोष्टी कान, डाळे उघडे देवून शिकू लागतो. म्हणता म्हणता बालक अवस्थेतून वर उठतो. चांगलं काय, वाईट काय, समजू लागतो व मग एके दिवशी ‘मुकी अंगडी बालपणाची’ जाऊन ‘रंगीत-वसने तारुण्याची’मध्ये आपसूकच प्रवेश करते होतो. नंतर सर्व लक्ष शिक्षण-अभ्यास यावर केंद्रीत होता होता-थोडंफार कळायला लागतं की आपण ‘माणूस’ आहोत. आपल्याला आपल्या भावना आहेत, स्वातंत्र्य आहे. घरच्यांच्या पाठबळावर शिकून मोठा होतो तेव्हा पहिली गोष्ट कळते ती ‘पैसा‘ हा मूळ आहे. तो आपल्याला कमावयचा आहे. त्यासाठीच शिक्षण केलय व मग तो धंदा-नोकरीचा विचार करू लागतो मित्र सल्ला देतात, घरचे सल्ला देतात व तो आपला मार्ग निवडतो.

नोकरी पक्की होईस्तोवर घरच्यांची तुमचे हात चार करण्याची चढाओढ लागते, तुमचे कुठे प्रेम बीम जमलं असेल तर गोष्ट वेगळी अथवा आई, नातलग सांगतील ती मुलगी तो पसंत करतो. आता त्याला आपले कुळ, जात, धर्म याचे थोडे ज्ञान झालेले असते. देवी देवतांवर विश्वास ठेवण्यास घरच्यांनी शिकवलेले असतेच. तो संसारात पडतो!

तिशीच्या आंत लग्न झाल्या झाल्या बऱ्याच गोष्टी उमजतात आणि मग तो नोकरीच्या रहाटगाडग्यात कधी साठी गाठतो कळतच नाही, आता निवृत्ति! येव्हां तो वर त्याची मुलं ही मोठी होऊन – पंख फुटून ती सुद्धा आपापल्या विश्वात भूरभूर उडून जातात. राहते ती ‘जीर्ण शाल’’, ‘लेणे वार्धक्याचे‘ आणि तो दिवस उजाडतो.

**‘पंचाहत्तरी‘**

अरे, मी आज ७५ वर्षांचा झालो, काळ कसा भरभर निघून गेला पत्ताच लागला नाही. सर्व सुखे अनुभवली. बरे वाईट प्रसंगांतून मार्ग काढत इथवर आलो. आज जणू हा ७५ वर्षांचा चित्रपट आपल्या डोळ्यासमोरून झरझर सरकतो. आयुष्याची इति झाली. फारसं कुणाला दुखवलं नाही ना कुणाशी झगडलो. जे झालं ते वरवरचंच!

स्वतःला स्वतःकडे वघून त्याला हसायला येतं. देवा तुझे उपकार कसे विसरू. तूच मला

वेळोवेळी तारून नेलेस–आज आता तूच आमचा आधार! तो त्याच्या म्हाताऱ्या होत चाललेल्या पत्नी बरोबर घराच्या पायरीवर बसून, तिच्या हातात हात घालून त्या सांजेच्या सूर्यास्ताकडे बघत राहतो. तिचे गुढग्यांचे दुखणे, त्याचे पोटाचे विकार सर्व बाजूला राहते.

तिने आजपर्यंत सर्व प्रकारच्या परिस्थितीत त्याला उत्तम साथ दिलेली असते. आज शब्द नसतात. नुसता तृप्त मनाचा आनंद दोघांच्या नेत्रांमधून ओसंडत असतो...

**– प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर**

## NOTICE

**To become LIFE MEMBER OF NKGSB-SANGH**

We hereby request our all regular Mukhapatrika readers to become LIFE MEMBER in case any of you still not become the life member.

We get many complaints regarding not receiving Mukhapatrika.

To solve this problem, we have to confirm whether your name is registered in our list. Many a time it is observed that some ones parents were members but after their death, the next generation has not become members. It is also found your address is changed but you might not have informed your new address. Some flats are gone for re-construction but unless you inform our office, it is difficult to send Mukhapatrika. Many such cases we come across. Thus, the best way is get yourself registered for Life Membership.

Another request is, if any of your relatives, those are not life members of Sangh, ask them to take membership form from Sangh office, fill it and become Life member so their name will appear automatically in the list and they would start getting facilities like Mukhapatrika on regular basis.

We are sure, you will follow the above instructions

Thanks.

Editor

**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

**SERVICE FIRST®**

98193 04599

SOCIETY SERVICE RESOURCE

समाजसेवा समृद्धि

99204 04599

**सर्वप्रथम सेवा®**

**SOCIETY SERVICE RESOURCE**

## विलेपारले महिला संघांच्या निबंध स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त निबंध

**– लेखन : नीलिमा नाडकर्णी**

# ‘संगीत - माणसाचा श्वास’

भूतलावर मानवसृष्टी निर्माण झाली, आणि जीवनावश्यक अशा कैक गोष्टींची आपल्या श्वासाइतकीच गरज त्याला भासू लागली. हवा, अन्न, पाणी या तर अग्रस्थानी होत्याच! पण त्यांच्याच जोडीला श्वासाइतकीच साथ देणाऱ्या काही मानसिक नि भावनिक अशा गोष्टीही जीवन सुखद करण्यासाठी पूरक म्हणून त्याला हव्याशा वाटू लागल्या. त्यापैकी अग्रस्थानी आहे, कलाक्षेत्रातील ‘संगीत’ नानाविध रुपे घेऊन मानवाचे मन जिंकणारे संगीत! बाळ जन्माला येते, अन् ‘बाळा जो जो रे’ म्हणत अंगाईगीत गायले, की त्याला शान्त झोप लागते, इथेच संगीताशी त्याची नाळ जुळते!

‘धीरे से आजा री आँखयन में, निंदिया आ जा री आजा, किंवा ‘आ जारी आ, निन्दिया तू आ, यांसारख्या चित्रगीतांमधून मानवजन्माचे नि संगीताचे हे अजोड नाते चित्रितही केले गेले! ‘वेद’ हे आपले आद्य वाङ्मय संगीताशी संबंधित सामवेद हेच सिद्ध करतो, की प्राचीन ऋषी–मुनीही संगीताची महती मानत होते म्हणूनच बहुधा श्लोकपठण, मंत्रपठण विशिष्ट चालीवर होऊ लागले! श्रीकृष्णाला पहाटे उठवण्याच्या कल्पनेचा आधार घेऊन शाहीर होनाजी बाळा यांनी रचलेली ‘घन:श्याम सुंदरा’ ही भूपाळी सारा दिवसच आनंददायी करते! मंदिरांमधून किंवा शनिवारवाड्यासारख्या ठिकाणाहून पहाटे येणारे सनई–चौघड्याचे सूर हे भूपाळीचेच प्रतीक म्हणता येईल!

विवाह असो वा व्रतबंध असो, अशा मंगल कार्यातही सनईचे सूर, बँडवादन हे आपल्याला हवेच असते. तसेच, मुहूर्ताचे वेळी गायलेल्या मंगलाष्टकांनी वातावरण भारुनच जाते, कारण सूर व लय दोन्हीशी आपण समरस होतो! आजकालच्या समारंभात तर ‘संगीत’ हा खास कार्यक्रम आयोजित केला जातो! स्त्रिया, मुली बहुतेक सण गाणी गाऊनच साजरे करीत आल्या आहेत. ‘भोंडला’ म्हणजे गाण्याची पर्वणीच! मंगळागौरीच्या पूजेतही तिला गीतांच्या आभरणांनी सजविण्यात त्यांना आनंद लाभतो. पूर्वी नागपंचमीच्या दिवशीही ‘चल ग सये वारुळाला’ म्हणत फेर धरून नागोबांची पूजा व्हायची!

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात आजही आमच्या सोसायटीच्या फाटकाशी ‘वासुदेव, नंदीबैलवाला’ वगैरे येत असतात. गाणी गातच येत असल्याने सर्वांचं लक्ष आकृष्ट होऊन खुषीने काहीबाही देतात! एक मजेदार अनुभव! आळीत बरेच भाजीवाले भाजी विकायला येत, विक्री करीत. एकदा एक नवा भाजीवाला आला, तो गातच! ‘‘भाजी घ्या भाजी, श्रीखंडावाणी भाजी! माझी भाजी खाईल, तो धट्टाकट्टा होईल! माझी मळ्यातली भाजी आहे खूप ताजी!’’ त्याच्या गाण्याची मजा वाटून लोकांनी भराभर घेतली!



कोळ्यांची दर्यागीतं, आदिवासींची वेगळी गीतं आपण ऐकतोच. ही का तयार झाली असतील? कारण हेच, की कामाचा, कष्टांचा शीण घालविण्याची जादू अशा संगीतात आहे! खेळाडू धावताना दमला, की श्वास घेतो (दम खातो) तसेच, कामकरी गाणं गात गात कष्टसाध्य कामही हातावेगळी करतो! कारण, तो त्याचा श्वासच असतो. इतकेच कशाला? जात्यावरच्या ओव्या गाता गाता स्त्रिया चार–सहा पायल्या भरून पीठ दळून ठेवीत, तेही हसत खेळत! छोटी छोटी मुले स्कूलमध्ये जातात, तिथे ‘बडबडगीते’ शिकतात, आणि चालीवर गाता गाता पटकन आत्मसातही करतात!

**एक जुनी आठवण**–आमच्या घराजवळ म्युनिसिपालिटीची एक शाळा होती निम्नस्तरातून येणाऱ्या त्यातील सर्वच मुलाना निरीक्षणाची आवड असावी, नसावी पण शिक्षकांनी सुरेख चाल लावल्यामुळे ‘दारास नाही दोऱ्या! या झोपडीत माझ्या’ ही कविता ती सारी इतकी रंगून म्हणत की आम्हाला घरबसल्या ऐकू येई! भूदल असो, आरमार वा वायुदल! तिन्ही दलातील जवान देशरक्षणास तत्पर! त्यांच्या स्फूर्तीला बळकटी देणारा मिलिटरी बँड, हे संगीताचेच रूप नाही का? याखेरीज, भजने, शाहिरी पोवाडे, लावण्या, भारुडे ही लोकगीते जन्माला आली, आणि भावगीते, नाट्यसंगीत, चित्रपटसंगीत यातून सामाजिक अभिरुची व्यक्त होऊ लागली. जुनी पिढी बालगंधर्वांच्या गाण्यांनी अक्षरशः मोहून गेली होती–कुमार गंधर्व, छोटा गंधर्व वगैरे नंतरचे गायक. स्त्री शिक्षणाचा प्रसार होण्यापूर्वी ‘गंगूबाई, मोगूबाई, हिराबाई’ वगैरेंची ख्याती झाली होती ‘ज्योत्स्ना भोळे, माणिक, वर्मा’ वगैरे लोकप्रिय झाल्याच, अन् ‘लता–आशा’ भगिनींनी तर गरुडझेपच घेतली! शास्त्रीय संगीताने साऱ्याच संगीताला भक्कम पाया दिला. ‘मिले सुर मेरा तुम्हारा’ गीतात स्वर देऊन शास्त्रीय संगीतातले एक मेरुमणी पं. भीमसेन जोशींनी ते सिद्धच केले!

**‘रामायण–कथा’** ज्ञात व प्रिय नसणारा भारतीय शोधूनही सापडणार नाही! पण सिद्धहस्त ‘ग.दि.मां’नी रचलेले अलौकिक ‘गीतरामायण’ अन् बाबूजींनी दिलेले श्रुतिमनोहर संगीत यामुळे ते काकणभर अधिकच ‘आपले’ झाले आहे! संगीतावरील या हृदयस्थ प्रेमामुळेच पूर्वी राजेलोकही ‘तानसेना’सारखे राजगायक आपल्या दरबारात नेमत!

मुलुंडमधल्या एका शल्यविशारदांनी भाषणात सांगितले होते, ‘शस्त्रक्रिया सुरू करण्याच्या वेळी मी मंद आवाजात गाणी लावतो.’ संगीत त्यांना नक्कीच हुरुप देत असणार! ‘संगीत मनको पंख लगाए’ ही गीतकाराची रचना सार्थ वाटते! वनस्पतींनाही भावना असतात, हे जगदीशचंद्र बोस यांनी सिद्ध केले होते–याच्या पुढे जाऊन पुढील शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे, की संगीतोपचारांनी–म्युझिक थेरपीने वनस्पती तर जोमाने वाढतातच, पण माणसाचे आरोग्यही सुधारते! कारण अर्थात्, क्षणोक्षणी आनंद देणारे संगीत हा माणसाचा ‘जीवनसाथी, म्हणजे श्वासाचीच जणू दुसरी आवृत्ती! तीही कालातीत अन् भेदातीत! मग ते स्नान करता करता ओठावर येवो, किंवा स्वयंपाक करता करता येवो!

## "ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन"

''ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन'' या संस्थेतर्फे आपल्या ज्ञातीतील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान अशा ७ सुप्रशिक्षित महिलांना 'सरस्वती पुरस्कार' प्रदान करून सन्मानीत करण्यात आले. हा सोहळा दि. २९ जून २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता 'दादर माटुंगा कल्चरल सेंटर' या सभागृहात नियोजित करण्यात आला होता.

ज्या महिलांना सन्मानित करण्यात आले त्या होत्या.

१) आदिती कारे पाणंदीकर (प्रसिद्ध उद्योजिका)
२) हिमांगी नाडकर्णी (अध्यक्षा, एन्. के. जी. एस्. बी. बँक)
३) निर्मला सामंत प्रभावळकर (राजकारण समाजसेवा)
४) पद्मश्री राव (प्रसिद्ध इतिहास अभ्यासिका)
५) स्मिता देव (प्रसिद्ध पाककला तज्ञ)
६) शेफाली वैद्य (प्रासिद्ध लेखिका, स्तंभ लेखिका)
७) शृजा प्रभुदेसाई (सुप्रसिद्ध अभिनेत्री)

सदर सोहळ्याचे सुत्रसंचालन स्मिता गवाणकर यांनी आपल्या मधुर आणि ओधवत्या शैलीत उत्कृष्टपणे केले. या प्रसंगी सुरेख गीतांचा कार्यक्रम (आकाश पेलताना) सादर करण्यात आला. विशेष म्हणजे सर्व वादक या स्त्रिया होत्या.

या सुंदर सोहळ्याच्या अंतिम भागात सर्व पुरस्कार विजेत्या महिलांची विस्तृत मुलाखत स्मिता गवाणकर यांनी घेतली. अशा प्रकारे हा 'सरस्वती पुरस्कार सोहळा' संपन्न झाला.

**– मच्छींद्र कसबेकर,**

– .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. –

### सरस्वती पुरस्कार, एक सुंदर कार्यक्रम

ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन सप्तरंग आयोजित शनिवार २९ जून २०२४ रोजी दादुर माटुंगा कल्चरल सेंटर, माटुंगा येथे सारस्वत बैंक, एनकेजीमुसनी बँक, व सुप्रिया लाईफ सायन्स यांच्या पुरस्काराने संपन्न झाला. स्मिता गवाणकरचे सूत्रसंचालन अप्रतिम झाले ७ महिलांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी आपले त्यांच्या क्षेत्रातील अनुभव सांगितले. ते खरोखरच आताच्या पिढीला उपयोगी ठरतील,

(१) अदिती कारे–पाणंदीकर (उद्योजिका)
(२) हिमांगी नाडकर्णी (बँकींग)
(३) निर्मला सामंत प्रभावळकर (समाजसेवा)



(४) पद्मश्री राव (इतिहास अभ्यासक)
(५) स्मिता देव (पाककला तज्ञ)
(६) शेफाली वैद्य (लेखिका)
(७) शृजा प्रभुदेसाई (प्रसिध्द अभीनेत्री) ह्यांचा सरस्वती पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला तसंच प्रत्येकाला एक गाणे गाऊन अर्पण करण्यात आले.

४ तासाचा हा कार्यकम त्यानंतर अल्पोपहार असा हा कार्यक्रम खरोखर वाखाणण्यासारखा झाला.

**– शांता पालेकर**

– .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. – .. –









***

## *मुंबई मंच - आनंद मेळावा*

आम्हाला कळवण्यात अत्यंत आनंद होत आहे की, कोविड पक्षात ३ वर्षांच्या खंडानंतर, मुंबई मंचाने जानेवारी २०२५ मध्ये सारस्वत आनंद मेळा करण्याचे योजिले आहे. या आनंद मेळ्यात खाद्यपदार्थांबरोबर विविध खेळ, कलाकुसरीच्या वस्तू (पर्सेस, शोभेच्या वस्तू आदी) या सर्वांचा समावेश असणार आहे. आपली कलाकृती, व्यवसाय आणि पाककला सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ ठरणार आहे.

आपण खाली नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारे यात सहभागी होऊ शकता:

१. खाद्यपदार्थांचा स्टॉल (ताजे तसेच फराळाचे)

२. मनोरंजक खेळांचा स्टॉल

३. केलेल्या वस्तू-कपडे, पर्सेस, शोभेच्या वस्तू इत्यादी. प्रायोजक/ (Sponshorship) - स्वतःचे बॅनर, व्यवसाय पत्रिका (flyer), भित्ती पत्रक

५. देणगीदार (Donation): आपल्या ज्ञातिचा हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्या सढळ आर्थिक मदतीसाठी मुंबई मंचतर्फे नम्र आवाहन.

**मेळ्याचा प्राथमिक तपशील असा आहे:**

**तारीख / वार :** रविवार, १९ जानेवारी २०२५

**स्थळ:** के. जी. एस. सोसायटीचे पटांगण, जोगेश्वरी,

वेळ: सायंकाळी 4.30 pm-9.30 pm

**इच्छुकांनी –**

NKGSB MumbaiManch@groups outlook.co या पत्यावर आपले संपूर्ण नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक आणि स्टॉल / देणगी / स्पॉन्सरशीप स्वरूप आदी तपशील मेल करावेत. तसेच पुढील पैकी कोणत्याही नंबरवर मेल केल्याबद्दल व्हॉटस् ॲप संदेश पाठवावा ही विनंती.

**१ प्रदीप दाभोळकर – ९७६४००६३०८**

**२. अमित वाध – ९८२०५२४३३९**

**३. वंदना सोहनी – ९८१९२१०३५४**

**४. संगीता कसबेकर – ९८१९४१६३३८**

पुढील मुखपत्रिकेत या कार्यक्रमाचा पूर्ण तपशील देण्यात येईल.

तुम्हा सर्वांच्या भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे.





**पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी**
जन्म : ५ मार्च १९३०
देवाज्ञा : ३१ ऑगस्ट २०२०

*तस्मादसक्त: सततं कार्यं कर्म समाचर ।*
*असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुष: ।।*
*भगवद्गीता, तृतीयोध्याय:*

**श्रद्धांजली**



**श्रीमती सिंधू पद्माकर दुभाषी**
देवाज्ञा १३ सप्टेंबर२०२१
जन्म : २० सप्टेंबर१९३८

*प्रेम देऊनी आम्हांला जवळ केले सर्वांना ।*
*उरली साथ तुमची, आठवणी येते क्षणाक्षणाली ।।*
*कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे अधुरे राहिले जीवन गाणे ।*
*आता फक्त एकच उरले तुमच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहणे ।।*

**– मेधा, देवदत्त, अर्चना (नात), जय (पणतू) –**

**डॉ. मेधा दुभाषी – Head of Centre for Gender Studies**
**Vaikunth Mehta National Institute ofCo-operative Management, Pune, INDIA**

## *श्रावण मास*

श्रावण मास आला दारी
चराचर सृष्टी सुखावली
मधुमालतीनं बांधिलं तोरण
प्राजक्ताने सजले अंगण
बकुळ फुलांचा सजला हार
जास्वंदीचा तोरा फार
देवचाफा सजला तबकात
तगरीनं पेटवली वात
श्रावण मास आला दारी ।
सुवर्णचंपक फुलला विपिनी
केवडा दरवळला केतकीवनी
सदाफुली, करवीर झुलती दारी
मोगरा फुलला अंगणी

रातराणीचा मधूर सुगंध
रात्र जागवी निशीगंध
दुर्वांकुरांचि हिरवी पाती
आनंदे हसती, डुलती
श्रावण मास आला दारी ।
तेरड्यांचा रंग तीन दिवस
परिउधळी रंगाची बरसात
कोरांटीचे घोस लगडती
बोगन फुलांची रंगसंगती
असा हवासा श्रावणमास
चराचरा पसरे अनोखा उल्हास

*–कुंदा र. देसाई*

## एका महान पर्वाचा अस्त

एक जुनी डिसेंबरची आकर्षक मुखपत्रिका आली अन् लगेचच मी वाचायला हातात घेतली. मा. संपादक श्री. डी.एन. यांचा लेख वाचला. त्या लेखामध्ये सदाशिवगडावर असलेला अगदी शारदाम्बा मठाचा उल्लेख आला. मन पाखरू झालं अन् क्षणात मठाच्या समोर असलेल्या महाकाय पिंपळाच्या पानावर विसावलं. या मठामध्ये प.पू. स्वामी शिवानंद सरस्वती महाराज यांची समाधी आहे. माझे मेव्हणे कै. विश्वेश्वर सुखठणकर भावोजी अगदी सोवळ्याने शारदेची पूजा करून प.पू.स्वामींच्या समाधीला अन्नाचा नैवेद्य दाखवित असत. मन पुन्हा भरकटले. अलीकडे पर्तगाळी मठाचे अधिपती प. पू. स्वामी विद्यादिराज सरस्वती महाराजांच्या महानिर्वाणाची बातमी ऐकली होती व त्यांची छायाचित्रेही पाहिली होती. २००५ साली (नक्की आठवत नाही) सारस्वतांच्या 'चैतन्य' त्रिमासिकात आलेला माझा लेख वाचनात आला. मला वाटते प्रत्येक G.S.B. व्यक्तीने हा लेख वाचावा म्हणजे आपल्याला अनभिज्ञ असलेली माहिती मिळेल असे वाटते.

बऱ्याच वर्षांनी मंगेशीचा रथोत्सवाचा सोहळा पहाण्यासाठीचा योग जुळून आला. मी फोंड्याला माझ्या भाच्याकडे डॉ. सुखठणकरकडे गेले. मी तीनचार वेळा मंगेशीला गेले, रथोत्सवाची जय्यत तयारी चालू होती, पण सर्वांच्या चेहऱ्यावर उदासी दिसत होती. प्रत्येकजण प. पू. स्वामी सच्चिदानंद सरस्वती महाराजांच्या तब्येतीबद्दल आपआपसात बोलत होते. सगळा समारंभ पार पडला परंतु सकाळी 'तरुणभारत'चा अंक सकाळी हातात आला. मन खिन्न झाले. प.पू. स्वामी महाराजांच्या महानिर्वाणाची माहिती अन् सोबत दिव्य असे छायाचित्र होते. टी.व्ही.वरही बातमी होती. मला आठवते दुसऱ्या दिवशी सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान त्यांना कवळे मठात समाधिस्त करण्यात आले. त्यांच्या दर्शनाचा लाभ मिळाला नाही. श्री. मंगेश आणि प.पू. स्वामीजींच्या प्रेरणेतूनच आमच्या समाजाला माहिती मिळावी म्हणून हा खटाटोप.

प.पू. स्वामी सच्चिदानंद सरस्वती महाराज के पादाचार्य कवळे मठ परंपरेतील ७६ वे पीठाधीश होते.

महानिर्वाण समयी त्यांचे वय ६९ होते. प. पू. स्वामी महाराजांचे दुपारी (गुरुवार) १२.४५ वा. महानिर्वाण झाले. त्यांच्या संन्यास दीक्षेला २००० मध्ये पन्नास वर्षे पूर्ण झाली होती. १६ जुलै १९५० रोजी त्यांनी दीक्षा घेतली होती असे कळले प.पू. स्वामी पूर्णानंद सरस्वती यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांनी आपल्या समाजासाठी गौरवशाली कार्य केले. लहान वयातच ते गुरुपीठावर आले. त्याचवेळी समाजामध्ये मोठाली स्थित्यंतरे होऊ लागली. माता श्री शांतादुर्गेच्या शब्दावरून त्यांना शिष्य म्हणून स्वीकारण्यात आलेले असल्यामुळे देवीच्या कृपाप्रसादाने शक्ती व बुद्धीच्या सामर्थ्यावर त्यांनी ती उत्तम रितीने पेलली. १ मार्च १९५१ रोजी



गुरुवर्यांनी केलेल्या **'मृत्युपत्रा'**तील तरतुदीनुसार प.पू. स्वामी महाराजांनी सगळा कारभार आपल्या हाती घेतला. आश्रम दीक्षेनंतर ते कवळे मठातच राहिले. १९५५ ला ते खानापूरला गेले अन् त्यांनी मठाच्या मालमत्तेची माहिती करून घेतली. १९५७ साली तेथे श्री. गौडपादाचार्य संस्कृत पाठशाला स्थापन करून विद्वान अध्यापकांची नेमणूक केली.

पुढे सारस्वत पीठाच्या इतर स्वामीजींकडे सतत संपर्क ठेवून संप्रदाय भेदामुळे समाजाच्या एकतेला बाधा येऊ नये म्हणून खूप दक्षता घेतली. त्यांनी लोककल्याणाच्या विविध योजना कार्यान्वित केल्या. बेळगाव मठात धर्मार्थ दवाखाना उघडण्यापासून दिल्लीसारख्या शहरात 'नूतन मठ' उभारण्यापर्यंत कार्य केले. सामाजात एकता दृढ व्हावी या दृष्टीनेच भरीव प्रयत्न केले. ज्या मठात अनुयायांची संख्या कमी आहे अशा ठिकाणी देखील संचार करून इतर मठांच्या अनुयायांकडून अन्य कार्य व स्वागत करून घेतले. प.पू. स्वामी महाराज, मनमोकळे होते. संप्रदायाचे भेद हे तात्विक स्वरूपाचे असल्याने व्यावहारिक पातळीवर समाजात प्रेम, सहकार्य व एकता स्थिर करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांची आस्थेने विचारपूस करून त्यांची सुखदुःखे जाणून घेत, धीर देत कमी बोलावे, प्रश्नावर तोडगा सुचवावा इ. तत्वे व वैशिष्ट्ये, करता आपल्या संस्कृतीच्या मूतृभाषेच्या कोकणीचा त्यांना विलक्षण अभिमान होता. कोंकणी तत्वतेने सारस्वत परंपरेतील सांस्कृतिक भाषा मानायचे आणि सारस्वतांच्या मेळाव्यामध्ये मग ते धार्मिक असोत किंवा सामाजिक असोत प्रत्येक वक्त्याने आपल्या 'कोंकणी'तून बोलावे असा त्यांचा आग्रह होता.

मुक्या जनावरांवर त्यांनी भरपूर प्रेम केले. श्री मठाच्या गोशाळेतील एक गाय त्यांचे नित्य दर्शन घेत असे म्हणतात. त्यांच्या जीवनात एक अद्भूत घटना घडली. मोटरीतून जात असताना त्यांच्या मोटारीला भयानक अपघात झाला. एका वाळक्या झाडाच्या खोडाचा आधार घेऊन त्यांची गाडी 'त्रिशंकू' अवस्थेत उभी राहिली. प.पू. स्वामी त्या प्रसंगाच्या वेळी अजिबात विचलीत झाले नाहीत. झाडाच्या रुपाने श्री. मंगेशाने त्यांचे रक्षण केले असे म्हणत असत.

आज ते आपल्यात नाहीत परंतु त्यांनी केलेल्या त्यांच्या भरीव कार्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळाली अन् भविष्यातही मिळत जाईल अशी खात्री आहे. एका महान पर्वाचा अस्त झाला आहे.

त्यांच्याच कृपाप्रसादाने माहिती गोळा करून हा लेख लिहिण्याचे धाडस केले. माझ्या अज्ञानामुळे काही चुका झाल्या असतील तर प.पू. स्वामी महाराज मला नक्की माफ करतील आणि आपले माझे जी.एस्.बी. बांधवही याची खात्री आहे.

प. पू. स्वामी सच्चिदानंद महाराज यांच्या पवित्र स्मृतीला वंदन आणि माझे शतश: प्रणाम.

**लेखिका – कुंदा र. देसाई** – मो.नं. ९८१९०५२३१९

## ठाणे मंच तर्फे एक दिवसाची सहल

**तारीख : रविवार, १५ डिसेंबर, २०२४ – आकार रू. ९०० प्रत्येकी**

**स्थळ : बलंग फार्म्स एन्ड रिसोर्ट ,** आंबाडी रोड, वज्रेश्वरी रोड,

बस प्रस्थान : जोगेश्वरी ... मुलुंड ठाणे

आपले पैसे NKGSB Bank, Naupada, Thane (W) येथे भरण्याची सुविधा

**SB a/c No. :** 020100100001816 / **IFSC code-** NKGS0000020

**संपर्क :**

**सुरेश पालेकर–८९२८८५०१९३ राजेश दिवेकर–९६१९३६२४६०**

**गिरीश रेगे–९९२२९६८७२५**

## ठाणे मंच आयोजित शब्द सुरांच्या रेशीम गाठी

**तारीख : रविवार, २२ सप्टेंबर, २०२४ रोजी**

**– सदाबहार मराठी–हिंदी भावगीत आणि चित्रपट गीतांचा कार्यक्रम तेंडुलकर हॉल माहिम येथे झाला.**

**– प्रमुख कलाकार होते पुणेफेम गायक श्री. शशांक दिवेकर आणि साथीस उत्तम वाद्यवृंद मग काय विचारता प्रेक्षकांस मिळाला एक उत्तम कलेचा नजराणा.**

**– मराठी–हिंदी जुनी भावगीत भक्तीगीत एकून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.**

**– कार्यक्रमास येण्या–जाण्यासाठी बसची उत्तम सोय आणि तेंडूलकर सभागृहात मस्त अल्पोपाहार मग काय विचारताय सोने पे सुहागा**

**'' सर्व प्रेक्षक ठाणे मंचास दुवा देत घरी परतले''.**

**–आश्वीनी वाघ, मुलुंड**

## ठाणे मंच – एन के जी एस बी मॅट्रीमोनी पोर्टल बंद करणे संदर्भात

आपल्या ज्ञातीतील विवाहेच्छुक मुलामुलींसाठी गेल्या २५–२६ वर्षा पासून ठाणे मंचने वधू वर सूचक मंडळ उपक्रम यशस्वीरीत्या राबविला. सुरवातीला ६ शाखाद्वारे भगिनींनी आपल्या घरून हे समाजोपयोगी कार्य उत्तम प्रकारे सांभाळलं. त्यानिमित्ताने आपल्या ज्ञातीत संपर्क होत असे. काळानुरूप आम्ही NKGSB Matrimony वेबसाईट द्वारे २०१५ मध्ये ऑनलाईन रिजस्ट्रेशन सुरू केलं. ३ वधुवर मेळावे ही आयोजित करण्यात आले. करोनानंतर व बदलत्या परिस्थितीत पुरेसा प्रतिसाद नसल्यामुळे गेल्या एप्रिल २०२३ पासून आम्ही नोंदणी तात्पुरती स्थगित केली होती. सखेद पूर्वक आम्ही आपणास कळवू इच्छितो की, सदर उपक्रम काही अपरिहार्य कारणामुळे आम्ही बंद करत आहोत. तरी सभासदांनी ह्याची नोंद घ्यावी व ह्यापुढे पत्रव्यवहार, फोन, ई मेल करू नये ही विनंती.

सदर कार्यात आम्हाला अनेकांचे मोलाचं सहकार्य मिळाले ज्या बद्दल कार्यकारिणी मंडळ ऋणी आहे.



## ठाणे मंच आयोजित
## कारवार आणि परिसरातील सफर

कारवार स्थायिक, आमचे हितचिंतक सर्वश्रुत श्री. संतोष शा. बोरकर आणि मच्छिंद्र अ. कसबेकर यांच्या प्रोत्साहनामुळे आणि सहकार्यामुळे कारवार सफर आयोजित केली आहे. तर मग येणार ना... यायलाच पाहिजे.

**तारीख : बुधवार, ८ जानेवारी, २०२५ ते**

**रविवार,१२ जानेवारी २०२५ (४ रात्र ५ दिवस)**

**पर्यटन स्थळे :** सदाशिव गड, कारवार परिसर, अंकोला, ईडगुंजी, गोकर्ण, मुरडेश्वर पर्यंत. वरिल स्थळांच्या वाटेत येणारी प्रसिध्द धार्मिक स्थळे.

**आकार** – प्रत्येकी – रू १९,०००/–

**(खर्च कमी झाल्यास उरलेले पैसे परत दिले जातील)**

(रेल्वे, प्लेन बुकींग इच्छुकांनी स्वत: करावयाचे आहे.)

मंच जबाबदारी घेणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(रेल्वे बुकींग चार महिने आधी होते.)**

घरगुती सफर असल्याने काही चुका, फेरफार होण्याची शक्यता आहे.

मर्यादित जागा असल्याने प्रथम पैसे भरणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल.

हॉटेल : **Karwar 1 - Amrut Aura, 2 - Sai International**

आपले पैसे NKGSB Bank, Naupada, Thane (W)

येथे भरण्याची सुविधा

**SB a/c No. :** 020100100001816

**IFSC code-** NKGS0000020

या सफरीत भाग घेऊ इच्छित व्यक्तिने बुधवार दिनांक ८ जानेवारी रोजी

**Amrut Aura Hotel, Main Road, Karwar City** येथे दुपारपर्यंत रिपोर्ट करावा.

Please Carry your Aadhar Card.

All purchases at own cost.

**END OF TRIP:** Proceed to Mumbai on 12th January 2025 after Lunch

**अधिक माहिती साठी संपर्क :**

**सुरेश पालेकर–८९२८८५०१९३ राजेश दिवेकर–९६१९३६२४६०**

**गिरीश रेगे–९९२२९६८७२५**

## —··—··—··— Kali Bridge and Its Facts —··—··—··—



**Karwar:** This morning when I heard the news of the collapse of Kali bridge my entire family was in deep shock as my father was in charge of this bridge for 6 years from 1976 till the time it was completed and inaugurated! With deep sorrow I would like to bring some facts about Kali bridge which was very dear to our heart! The construction of Kali bridge was started in the year 1965 and the work was entrusted to Gannon Dunkerly for one crore rupees & they were to complete the bridge by 1968! Gannon & Dunkerly started the construction and due to technical difficulties encountered, they abandoned the work in 1969 without much progress and the company went into liquidation!

In the year 1970 again the tender was called and the work was awarded to Udani Engineering. Udani Engineering started the construction and within one year their owner met with a car accident and died. The work again came to a halt. Fresh tenders were again invited and a year later Gammon India Limited agreed to construct the bridge for Rs.1.5 crores! Gammons were supposed to complete the bridge by 1975! In four years from 1971 to 1975 the engineers and the construction company faced numerous teething and intriguing problems! At this stage engineers from national highway department were reluctant to get posted on Kali river bridge site!

In 1976 my father who was working in the Irrigation department at Belgaum was asked to take over the responsibility as he had worked during the construction of Gangavali & Aghnashini bridges! In 1976 he took over the responsibility and after consultation with a foreign design firm( can't recall the name) for the first time in the country pneumatic sinking method was adopted which was costlier and riskier! As many as 10 to 12 people lost their lives during the sinking of wells.In the year 1982 the bridge was completed and Gammons incurred huge losses during construction.The technology was new and there could have been some shortcomings! I am sure in a few days Gammon India will come out with some statement on the issue! Lack of periodic maintenance may also be one of the factors!

Whatever may be the reason it's a very sad day for all of us Karwarians! I only hope the Government officials learn a lesson and other bridges in Karwar district like Gangavali and Aghnashini bridges(more than 50 years old now) a thorough structural audit is taken up immediately and periodic maintenance is done.(I have written this article with the help of my father's subordinate who was a junior engineer during the construction of Kali bridge) **- Vinayak Shanbhag**

**Contributed by: Mr. Shailesh Haldipur, Karwar and Sri. D N Nadkarni, Mumbai**

—··—··—··—



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या (मागील अंकानंतर ) उल्लेखनीय देणग्या

**१. कै. व्ही. एन नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृध्दसेवा निधीला पाच लाख रुपयांची देणगी**

स्टेट बँक ऑफ इंडिया या भारतातल्या सर्वात मोठ्या बँकेचे माजी अध्यक्ष कै. विश्वनाथ नागेश नाडकर्णी हे संघाचे एक हितचिंतक होते. वेगवेगळ्या प्रसंगी त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम रुपये ८ लाख एवढी आहे. त्यात त्यांच्या अमृतमहोत्सवा प्रसंगी दिलेल्या ५ लाख रुपयांच्या देणगीचा समावेश आहे. २८ जुलै २०२४ रोजी त्यांची जन्मशताब्दी. त्याप्रसंगी त्यांची कन्या सौ. ज्योति(रेखा) दिपक वागळे व सुपुत्र गिरीष व शिरीष नाडकर्णी यांनी सदाशिवगड ट्रस्ट तर्फे आणखी ५ लाख रुपयाची देणगी दिली आहे. श्री. नाडकर्णी यांची वरिष्ट हुद्यावर नेमणूक झाल्या बद्दल व त्यांच्या भरीव योगदाना बद्दल संघाने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्विकृत करून त्यांचा सन्मान करण्यात आला होता. श्री. नाडकर्णी यांच्या वरचा त्यांची नात कविता हिने लिहिलेला लेख याच अंकात अन्यत्र दिला आहे.

**२. श्री. मयुरेश वागळे यांच्या तर्फे एक लाख रुपयांची देणगी.**

माहिम येथे राहणारे श्री. विश्वनाथ विठ्ठल वागळे यांचे सुपुत्र श्री. मयुरेश यांनी अलिकडेच १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील ५०,००० रुपये वडिल श्री. विश्वनाथ वागळे यांच्या ९०व्या वाढदिवसाच्या प्रसंगी वृध्दसेवा निधी साठी आहेत व उर्वरित ५०,००० रुपये आई श्रीमती विजयलक्ष्मी (ऊषा) यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटी साठी आहेत.

**३. श्रीमती सीमा शेटगिरी यांच्या तर्फे वृध्दसेवा निधी साठी आणखी एक्कावन हजार रुपयांची देणगी**

अंकोला येथील श्री. श्रीपाद नारायण शेटगिरी हे एक मोठे जमीनदार होते. त्यांचा एक सुपुत्र श्री. जयवंत (विनू) शेटगिरी हे एअर इंडिया मध्ये नोकरीला होते. २०१३ च्या जुलै महिन्यात त्यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांच्या पत्नी श्रीमती सीमा यांनी पतीच्या स्मरणार्थ वृध्दसेवा निधी साठी एक लाख रुपयांची देणगी दिली होती. आता त्यांनी आणखी ५१ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**४. श्रीमती मिनल हेमंत वागळे यांजकडून वृध्दसेवा निधी साठी पन्नास हजार रुपयांची देणगी**

ठाणे मंचचे एक सक्रीय सभासद कै. दुर्गादास शंकर रेगे हे तेथील समाज बांधवांमध्ये लोकप्रिय होते. त्यांची भाची श्रीमती मिनल हेमंत वागळे यांनी मामा श्री. रेगे, आई श्रीमती मंगला प्रेमानंद मुजमुदार व मावशी श्रीमती विद्या गंगाराम पाडगांवकर यांच्या स्मरणार्थ वृध्दसेवा निधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती निलम शांताराम कुलकर्णी यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. शांताराम (अरूण) सदानंद कुलकर्णी यांजकडून | ५,००० |
| २ | श्री शंकर नीळकंठ नेत्रावळी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री गजानन यांजकडून | ५,५०५ |
| ३ | आजी आजोबा श्रीमती रमाबाई व श्री. त्रिंबक वैकुंठ कसबेकर व आई वडील श्रीमती सुधा व श्री विश्वंभर त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ देविदास यांच्याकडून | २१,००० |
| ४ | श्रीमती इंदू सदानंद नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ अनामिक कडून | १,००१ |
| ५ | श्री. विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांच्या १०० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. दत्तात्रय यांजकडून | १०,००० |
| ६ | आई वडिलांच्या स्मरणार्थ अनामिका तर्फे | ५,००१ |
| ७ | श्री. सदानंद कृष्ण देसाई यांजकडून संघाला देणगी | १२,००० |

## वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या १०व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून | ३,००० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती मंगला शिवानंद वागळे यांच्या स्मरणार्थ पति श्री. शिवानंद भास्कर वागळे यांजकडून | २५,००० |
| २ | श्री. वसंत वामन वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती पुष्पा यांजकडून | ११,००० |
| ३ | आई श्रीमती मंगला प्रेमानंद मुजुमदार, मावशी श्रीमती विद्या गंगाराम पाडगांवकर व मामा श्री. दुर्गादास शंकर रेगे यांच्या स्मरणार्थ श्रीमती मीनल हेमंत वागळे यांजकडून | ५०,००० |
| ४ | श्री मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शीतल व शिल्पा मधुकर नाडकर्णी यांजकडून | २,००१ |
| ५ | श्री. विश्वनाथ विठ्ठल वागळे यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी पुत्र श्री. मयुरेश यांजकडून | ५०,००० |
| ६ | श्रीमती विजयलक्ष्मी (उषा) विश्वनाथ वागळे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अंजली यांजकडून | १०,००० |
| ७ | श्रीमती सीमा जयवंत शेटगिरी यांजकडून | ५१,००० |
| ८ | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहाच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा रमेश वागळे (गीता नेत्रावळी) यांजकडून | १८,००० |
| ९ | श्री. श्रीकांत बळवंत बोरकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती नंदिनी व श्री. मिलींद अनील घोटींग यांजकडून | ५,००० |



| | | |
|---|---|---|
| १० | श्रीमती इंदिरा रामचंद्र कामत (विठा कामत) यांच्या स्मरणार्थ अनामिकाकडून | २५,००० |
| ११ | श्री. दिगंबर गणेश गुंजीकर यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या पत्नी शीला यांजकडून | ५,००० |
| १२ | कै. विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांची कन्या सौ. ज्योती(रेखा) दीपक वागळे व सुपुत्र गिरीष व शिरीष नाडकर्णी यांनी सदशिवगड ट्रस्ट तर्फे | ५,००,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभांगी श्रीरंग जोशी यांजकडून | १०,००० |
| २. | श्रीमती इंदिराबाई श्रीपाद वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती पुष्पा वसंत वागळे यांजकडून | ११,००० |
| ३. | आजी आजोबा श्रीमती राधाबाई व श्री. वेंकटराव विठ्ठल नाडकर्णी यांच्या पुण्य तिथी प्रसंगी नाती श्रीमती शीतल व शिल्पा मधुकर नाडकर्णी यांजकडून | २,००१ |
| ४. | श्रीमती माधवी मधुकर नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शीतल व शिल्पा मधुकर नाडकर्णी यांजकडून | २,००१ |
| ५. | श्रीमती विजयलक्ष्मी (उषा) विश्वनाथ वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मयुरेश यांजकडून | ५०,००० |
| ६. | श्रीमती बेबी अंबाजी बोरकर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी भाची श्रीमती सुशांता (पुष्पा) शिवानंद तेलंग यांजकडून | २,००१ |
| ७. | श्री. नीळकंठ कुलकर्णी यांच्या २५व्या पुण्यतिथी निमित्त (१.८.२४) नाडकर्णी कुटुंबीय व त्यांच्या कन्या यांजकडून | १५,००१ |

## ठाणे मंच देणगी :

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सदानंद कृष्ण देसाई, ठाणे यांज कडून | ५,००० |

### चुकीची दुरुस्ती

१) जुलै ते सप्टेंबर २०२४ च्या मुखपत्रिकेत संघास मिळालेल्या देणग्यांमध्ये नंबर ४ च्या देणगीत ''सद्चिदानंद' ऐवजी सदानंद नागेश नाडकर्णी झाले आहे.

२) तसेच त्याच अंकात नंबर ५ च्या संघाच्या देणगीमध्ये 'सदानंद' ऐवजी सद्चिदानंद गणपत नाडकर्णी झाले आहे. तरी चूक सुधारून घ्यावी ही नम्र विनंती.

३) त्याच अंकाच्या संघाच्या देणगीमध्ये नंबर १ च्या देणगीत श्री. अरुण कसबेकर यांजकडून १५०० रु.ची देणगी ही त्यांच्या 'कवडसे मनाचे' पुस्तकाच्या विक्रीचे पैसे (जे ते नेहमी डोनेट करतात) त्याचे आहेत. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | यशवंत बाळकृष्ण भेडसगांवकर | शिरसी | पुणे |
| २. | सोनल उमेश देसाई | होंडाक्कल | पनवेल |
| ३. | उषा (सुधा) बालकृष्ण देसाई | बेटकुळी | पुणे |
| ४. | वृंदा अरविंद दिवेकर | कणसगिरी | मुलुंड |
| ५. | सविता सतिश कसबेकर | खारगे | नॉर्वे |
| ६. | संगीता वेंकटराव कुलकर्णी | मुदगेरी | पणजी, गोवा |
| ७. | अरविंद नारायण नाडकर्णी | अंकोला | सांताक्रुझ |
| ८. | जगदीश कृष्णराव पिंगे | कडवाड | गिरगांव |
| ९. | प्रकाश विश्वनाथ तेलंग | बाड | जोगेश्वरी |
| १०. | उमा हरीहर वैशणव | सदाशीवगड | शिवाजीपार्क |
| ११. | मंजीरी मकरंद वेदविख्यात (पूर्वाश्रमीची शांता सदानंद वर्टी) | सदाशीवगड | चेंबूर |
| १२. | सुधा घनश्याम वर्टी | सदाशीवगड | माहीम |
| १३. | स्वाती आनंद वागळे | माजाळी | दादर |
| १४. | इंदिराबाई गोविंद वाघ | सदाशीवगड | सदाशीवगड |

## श्रध्दांजली

**प्रिय कुंदा (गायत्री उदय तेलंग)**

तुला जाऊन १ वर्ष झाले.

तुझ्या आठवणी शिवाय एकही दिवस जात नाही. तुझ्या स्मृतिस वंदन..


**– मृदुला भांडारकर**

अरुण भास्कर कसबेकर यांच्या '' **कवडसे मनाचे** '' ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.